# पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१
# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट ता. - १८/०१/२०२३

### एम.आय.डी.सी भोसरी पोलीसांनी महिलेचे हारवलेले दागिने परत मिळवून दिले.

### (एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन तपास पथकाची कारवाई)

दिनांक १६/०१/२०२३ रोजी सकाळी ०९/०५ वाचे सुमारास दिगंबर पाखरे हे त्यांचेकडील स्वीफ्ट कार मधून गणेश प्लाझा, जाधववाडी येथून राहते घरातून त्यांचे पत्नीस सेंट्रल मॉल शिवरस्ता येथे कामावर जाणेकामी सोडले. त्यांची पत्नी सौ.सरला दिगंबर पाखरे या तेथून पायी चालत कामाचे ठिकाणी गेले त्यावेळी त्यांचे लक्षात आले की, त्यांचे १० ग्रॅम वजनाचे ५३,०००/- रु.किंमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र कोठेतरी पडले आहे.त्यांनी त्याबाबत त्यांचे पती दिगंबर पाखरे यांना माहिती देवून ते दोघे पती,पत्नी मंगळसूत्र हारवलेबाबतची तक्रार करण्यासाठी एमआयडीसी भोसरी पोलीस स्टेशन येथे येवून पोलीसांना सांगितले. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे यांनी सदरबाबत तपास पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सचिन चव्हाण व तपास पथक यांना मंगळसूत्राचा शोध घेणेबाबत सूचना दिल्या त्याप्रमाणे पोलीस शिपाई २८५२ भागवत शेप, पोलीस शिपाई २६४८ विशाल काळे हे सदर फिर्यादी सोबत जावून दिगंबर पाखरे यांचे राहते घर ते त्यांची पत्नी सौ.सरला पाखरे ज्या ठिकाणी कामावर गेले त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फूटेजची पाहणी केली असता सदरचे सोन्याचे मंगळसूत्र हे दिगंबर पाखरे यांनी त्यांची पत्नी सरला पाखरे यांना कामावर सोडण्यासाठी सेंट्रल मॉल शिवरस्ता येथे त्यांची स्वीफ्ट कार उभी केली होती त्या ठिकाणी बाजूलाच सौ.सरला पाखरे यांचे १० ग्रॅम वजनाचे ५३,०००/- रु.किंमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र मिळून आले. सदरचे सोन्याची मनी मंगळसूत्र हे **मा.श्री विवेक पाटील** सो. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड, यांचे हस्ते पाखरे दामपत्य यांना सुर्पूत करण्यात आले आहे.

सदरची कारवाई **मा.श्री विनयकुमार चौबे** सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, **मा.श्री मनोज लोहिया** सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, **मा.श्री डॉ. संजय शिंदे** सो. अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, **मा.श्री विवेक पाटील** सो. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड, **श्रीमती प्रेरणा कट्टे** सो. सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांचे सुचना व मार्गदर्शना नुसार **राजेंद्र निकाळजे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सचिन चव्हाण, पोलीस उप निरीक्षक पोलीस अंमलदार चंद्रकांत गवारी, भागवत शेप, विशाल काळे,** यांनी मिळुन केली आहे.

**(विवेक पाटील)**
पोलीस उप आयुक्त
परि-१, पिंपरी चिंचवड